# प्रेस नोट दिनांक २७/०९/२०१८

## मोका मधील पाहिजे असणाऱ्या देश पातळीवर कार्यरत कुप्रसिध्द वेश्या दलाल "विजय सिंग" यास अटक

गेले ५ वर्षापासून मुंबईमधून देश पातळीवर तसेच उजबेकीस्तान, रशिया येथील मुलींमार्फत वेश्या व्यवसायासाठी मुली पुरविणारा कुप्रसिध्द दलाल तसेच मोका अंतर्गत येरवडा पोलीस स्टेशन, गु.र.नं. ७५७/२०१७ भा.द.वि. कलम ३७०, ३७०(अ) सह इटपा कायदा कलम ३,४,५ या गुन्ह्यास महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१) (ii), ३(२), (३)(४) मध्ये पाहिजे असणारा खालील नमूद आरोपी यास दिनांक २६/०९/२०१८ रोजी बोरीवली वेस्ट, मुंबई येथे ताब्यात घेऊन आज दिनांक २७/०९/२०१८ रोजी नमूद गुन्हयात अटक करुन मोका कोर्टामध्ये हजर करण्यात येत आहे.

१) कपील श्रीमंतराव पाटील उर्फ विजय सिंग, वय २७ वर्षे रा. सिमपोली मेट्रो स्टेशन समोर एसआरए टॉवर फ्लॅट नं. ११०७ ,११ वा मजला बोरीवली वेस्ट, मुंबई मुळरा. हुनजी ता.भालकी जिल्हा बिदर, कर्नाटक,

सदर विजय सिंग हा मुळचा मुंबई येथील असून गेले ५ वर्षापासून मुंबईमधून वेश्या व्यवसायासाठी देश व परदेशातील मुली, महिला देशातील वेगवेगळया भागांमध्ये वेश्या व्यवसायामध्ये कार्यरत असणाऱ्या दलालांना पुरविण्याचे काम करीत होता. वर नमूद गुन्हयामध्ये त्याचे फक्त "विजय सिंग" हे नाव निष्पन्न झालेले होते. तपास अधिकारी यांनी सामाजिक सुरक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत त्याचा संपूर्ण नाव व पत्ता प्राप्त करुन गेले १० दिवसांपासून त्याला शोधण्यासाठी १ पथक ठेवण्यात आलेल्या पथकाद्वारे त्याला अटक करण्यात आलेली असून त्याच्याकडे पुणे शहरामध्ये नमूद गुन्हयामध्ये अधिक तपास करीत आहे.

वरील नमुद कारवाई ही मा. श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ.मनिषा झेंडे, नरेश बलसाने, ज्ञानेश्वर देवकर, राजेंद्र ननावरे, किरण अब्दागिरे, यांनी कारवाई केली आहे.

## प्रेसनोट दि. २७/०९/२०१८

## सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा पुणे शहर यांचे कडुन बंगल्यामध्ये छापा टाकुन महाराष्ट्रीन मुलीची वेश्याव्यवसायातुन सुटका

दि.२७/९/२०१८ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. मनिषा झेंडे, यांना पोलीस हवालदार नितिन तरटे यांचे कडुन सुखसागर नगर मधील साई समृदधी या बंगल्यामध्ये विश्वराज ऊर्फ कृष्णा व महीला नामे मानसी हे दोघे मुलींना वेश्या व्यवसायाकरीता बोलावुन घेवुन त्यांना पैशाचे आमीष दाखवुन त्यांच्याकडे गि-हाईक पाठवुन त्यांच्याकडुन वेश्या व्यवसाय करुन घेत आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाली.

त्यावरुन अनैतिक मानवी वाहतुक व्यापार प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ.मनिषा झेंडे व विभागाकडील अधिकारी, कर्मचारी तसेच बिबवेवाडी पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अजित लकडे यांनी संयुक्त कारवाई करुन सुखसागर नगर मधील साई समृदधी या बंगल्यामध्ये येथे वेश्या व्यवसाया बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला. छाप्या दरम्यान महाराष्ट्रातील एका सज्ञान मुलीची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन तीला वेश्या व्यवसायास लावणारा महिला एजंट १) मानसी जितेंद्र मगीया वय-२३ वर्षे रा. अभिलाशा सोसायटी, फ्लॅट न.३०३, दत्तनगर कात्रज पुणे मुळ राह.नारायणजी प्रेमजी बिल्डींग,सावरकुंडला ता.अमरेली सौराष्ट गुजरात २) विश्वराज ऊर्फ कृष्णा सर्जेराव विधाते वय-२८ वर्षे रा. सर्वे नं. १८/२, साई समदधी, सुखसागर नगर, कात्रज, पुणे याचे विरुध्द बिबवेवाडी पोलीस स्टेशन पुणे २४९/२०१८ इटपा ॲक्ट १९५६ चे कलम ३, ४, ५, सह भादंवि कलम ३७०, ३७० (अ) ३४. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी मानसी जितेंद्र मगीया व विश्वराज ऊर्फ कृष्णा सर्जेराव विधाते यांना कारवाईचे वेळी ताब्यात घेण्यात आले आहे.

कारवाईचे वेळी रोख रु. २५००/- रुपये, ३ मोबाईल फोन, व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या गुन्ह्यातील पिडीत सज्ञान मुलीस रेस्क्यु होम, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२,यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ.मनिषा झेंडे, सपोनि अनिता खेडकर, आनंत व्यवहारे, नामदेव शेलार, राजाराम घोगरे,नितिन तरटे, ननिता येळे, गितांजली जाधव, सुप्रिया शेवाळे, सुनिल नाईक, रेवनसिध्द नरोटे यांनी व बिबवेवाडी पोलीस स्टेशनकडील वपोनि श्री. अजित लकडे व त्यांचे स्टाफसह सयुंक्तीक कारवाई केली आहे.